पुढारी

# इंडो स्पॅनिश व मास यांच्यात निर्यातवाढीचा सामंजस्य करार

खेड : पुढारी वृत्तसेवा

इंडो स्पॅनिश चेंबर ऑफ कॉमर्स आणि मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा (मास) यांच्यात सातारा जिल्ह्यातील उद्योग आणि निर्यातवाढीसाठी पुणे येथे इंडो स्पॅनिश चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीत सामंजस्य करार झाला. मासच्या या प्रयत्नाने सातारा जिल्ह्यातील उद्योग वाढीला चालना मिळणार असून जिल्ह्यातील उद्योजकांना स्पेनच्या उद्योगात व्यवसाय करण्यासाठी नवी संधी निर्माण होणार आहे.



निर्यात वाढीच्या सामंजस्य करार देताना इंडो स्पॅनिशचे अध्यक्ष ऑक्सर एस्टेबन, धैर्यशील भोसले, शेजारी राहुल शिंदे.

हा सामंजस्य करार करण्यासाठी इंडो स्पॅनिश ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ऑक्सर एस्टेबन यांनी मासच्या प्रतिनिधींना पुणे येथे निमंत्रित केले होते. उद्योग व निर्यात वाढीच्या या महत्वपूर्ण करारावर इंडो स्पॅनिशचे अध्यक्ष ऑक्सर एस्टेबन मासच्यावतीने संचालक धैर्यशील भोसले यांनी सह्या केल्या आहेत. या सामंजस्य करारामुळे सातारा जिल्ह्यातील मास सदस्यांना उत्पादनाच्या निर्यातवाढीस स्पेन देशात चालना मिळणार आहे. तर स्पेनच्या उद्योजकांना सातारा जिल्ह्यात उद्योग वाढीची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच स्पॅनिश उद्योगांचे सहकार्य, संयुक्त संशोधन, विकास आणि आयात निर्यात निर्मितीसाठी संधी निर्माण होऊन स्पॅनिश कंपन्यांचा सातारा जिल्ह्यातील पुरवठादार, विकास, मेक इन इंडिया उपक्रम यशस्वी होऊन स्थानिक संस्थांमार्फत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळणार आहे.

यावेळी स्पेनचे आर्थिक व वाणिज्य सल्लागार व्हिन्सेंट गोमीस, इंडो स्पॅनिशचे संचालक व बीबीव्हीएचे आशिया प्रतिनिधी जोएल अकलीन, मासचे सहसचिव राहुल शिंदे, स्पॅनिश कंपनीचे व वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, आर्थिक व वाणिज्य दूतोवासाचे सदस्य उपस्थित होते. स्पॅनिश उद्योजकांनी मास सोबत सहकार्य करण्याची तयारी दाखवली.